साप्ताहिक

# परळी परिसर

* परळी वैजनाथ * बुधवार, दि. २१ ऑगस्ट २०२४ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.








## परळीत आजपासून राज्यस्तरीय कृषी महोत्सवास सुरूवात

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, कृषीमंत्री धनंजय मुंडे, आ.पंकजाताई मुंडे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार उद्घाटन

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी येथील कृषी महोत्सवाच्या माध्यमातून राज्यातील सुमारे एक कोटी शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या नमो किसान महासन्मान योजनेचा चौथा हफ्ता मुख्यमंत्री, केंद्रीय कृषी मंत्री व मान्यवरांच्या हस्ते आज वितरित करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. याच कार्यक्रमाच्या निमित्ताने राज्य शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या सोयाबीन-कापूस उत्पादक शेतकऱ्यांना द्यावयाच्या अनुदानाचे वितरण करण्यासाठी सुरू करण्यात येत असलेल्या पोर्टलचेही अनावरण करण्यात येणार आहेत. एकूणच लाडक्या बहिणींच्या पाठोपाठ आता शेतकरीही लाडका ठरणार आहे.

आज पासून २५ ऑगस्ट पर्यंत असे पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचे बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ येथे आयोजन करण्यात आले असुन, परळी व बीड जिल्ह्याच्या इतिहासात राज्यस्तरीय कृषी महोत्सव पहिल्यांदाच होतो आहे. या महोत्सवाचे आज दुपारी १ वाजता दिमाखदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

परळी वैद्यनाथ नगरीमध्ये प्रथमच होत असलेल्या राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या उद्घाटन समारंभास महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे त्याचबरोबर केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, मंत्री अब्दुल सत्तार, मंत्री तानाजी सावंत, मंत्री अतुल सावे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रांताध्यक्ष खा. सुनील तटकरे, राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आ.पंकजाताई मुंडे यांच्यासह राज्यातील व बीड जिल्ह्यातील मान्यवर आमदार, खासदार व लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. २१ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानावर उभारण्यात आलेल्या भव्य सभामंडपामध्ये या कृषी महोत्सवाचे उद्घाटन संपन्न होणार असून, कृषी प्रदर्शनाच्या भव्य सभामंडपास शेतकरी नेते स्व.पंडित अण्णा मुंडे यांचे नाव देण्यात आले आहे. उद्घाटन समारंभाच्या अगोदर छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करून छत्रपती शिवाजी महाराज चौकातून भव्य रॅली द्वारे मान्यवरांचे स्वागत करण्यात येणार आहे. या कृषी महोत्सवाच्या माध्यमातून पाच दिवसीय भव्य असे कृषी प्रदर्शन, पशुप्रदर्शन, धान्य महोत्सवच, चर्चासत्रे व संवाद, विविध आधुनिक अवजारांची प्रात्यक्षिके, रानभाज्या महोत्सव, यशस्वी शेतकऱ्यांचा सन्मान व त्यांच्या यशोगाथा, त्याचबरोबर महिला बचत गटांनी बनवलेल्या विविध उत्पादनांची विक्री, शेतीतील वेगवेगळ्या उत्पादनांची उत्पादक ते ग्राहक थेट विक्री, ड्रोन फवारणीची प्रात्यक्षिके, यांसह शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरणाऱ्या असंख्य उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सेंद्रिय शेती व नैसर्गिक शेती यांची दालने, भाजीपाला महोत्सव, शेतकरी उत्पादक कंपन्यांनी उत्पादित केलेल्या पदार्थांची थेट विक्री, कृषी विद्यापीठांमधील नवनवीन संशोधनाची प्रात्यक्षिके यांसारखे अनेक उपक्रम नाविन्यपूर्ण पद्धतीने या कृषी महोत्सवात शेतकऱ्यांना अनुभवायला मिळणार आहेत. यासाठी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात कृषी विभागाने जय्यत तयारी केली असून भव्य वॉटरप्रूफ सभामंडप, चर्चा सत्र व अन्य कार्यक्रमांसाठी आणखी मंडप, आसन व्यवस्था, त्याचबरोबर विक्रेत्यांसाठी शेकडो वॉटरप्रूफ स्टॉल्स यासह वाहन पार्किंग, भोजन आदी चोख व्यवस्था करण्यात आली आहे.

दरम्यान या कृषी महोत्सवात राज्यभरातून शेतकरी तसेच शेती विषयी आवड असणारे नागरिक सहभागी होणार असून त्यांच्या सर्व मान्यवरांच्या स्वागतासाठी संपूर्ण परळी वैद्यनाथ नगरी सज्ज झाली आहे. बीड जिल्ह्यात राज्यस्तरीय कृषी महोत्सव पहिल्यांदाच होत असल्याने जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासह कृषी विभागाच्या अधिकारी - कर्मचारी तसेच पदाधिकाऱ्यांमध्ये कमालीचा उत्साह पाहायला मिळत आहे.

दरम्यान बीड जिल्ह्यात प्रथमच होत असलेल्या या राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या योजनांसह शेतकरी बांधवांना अनेक प्रकारचे लाभदायक मार्गदर्शन मिळणार असून ही शेतकऱ्यांसाठी एक आगळी वेगळी पर्वणी ठरणार आहे तरी राज्यभरातील शेतकरी बांधवांनी या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे. **

## श्रावणानिमित्त प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी भाविकांची दररोज वाढती गर्दी

परळी वैजनाथ (बातमीदार):- बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग म्हणून ओळख असलेल्या परळी वैजनाथ येथील प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी श्रावणमास उत्सवानिमित्त वाढती गर्दी असून दररोज हजारो भाविक शिवदर्शन घेत आहेत.

दर्शनासाठी महाराष्ट्रासह देशभरातून भाविक येथे येत आहेत. यंदा श्रावणाला सोमवारी सुरूवात झाली आहे. पाच श्रावणी सोमवार आले आहेत. हा योग बऱ्याच वर्षानंतर जुळून आला आहे. राज्यात सर्वत्र झालेला समाधानकारक पाऊस व बहरलेली खरिपाची पिके यामुळे उत्साहाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर श्रावणानिमित्त वैद्यनाथाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गर्दीही मोठी आहे. पहाटे वैद्यनाथाची काकडा आरती त्यानंतर पूजा होऊन दर्शनाला सुरूवात होते. रात्री उशिरापर्यंत मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले आहे. दररोज हजारो भाविक वैद्यनाथाचे दर्शन घेवून आरतीपूजा करत आहेत. शिवपिंडीवर बिल्वपत्र अर्पण करत आहेत.



श्रावण सोमवारी भाविकांची मोठी गर्दी पडते आहे. पहिल्या श्रावण सोमवारी सुमारे पंचाहत्तर हजार, दुसऱ्या सोमवारी एक लाख व तिसऱ्या सोमवारी एक लाखावर भाविकांनी प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेतले. भाविकांची गैरसोय होवू नये म्हणून स्त्री, पुरूष भाविकांच्या वेगवेगळ्या रांगा करण्यात आल्या आहेत. शिवाय शंभर रुपये देणगी देवूनही विशेष दर्शन व्यवस्था करण्यात आली आहे. दर्शनाला आलेल्या भाविकांची गैरसोय होवून जागोजाग सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत. देवस्थान संस्थेचे विश्वस्त, कर्मचारी, पोलिस आदी दर्शन व्यवस्था चोख व्हावी म्हणून परिश्रम घेत आहेत.

दरम्यान, पालकमंत्री धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या येथील नाथ प्रतिष्ठाणच्या वतीने श्रावणानिमित्त मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली तर श्रावण सोमवारी मुख्य मंदिर फुलांनी सजवले जात आहे. यामुळे मंदिराचे रुप अधिकच देखणे होत आहे. ***

# विधानसभेच्या तोंडावर परळीच्या महाविकास आघाडीत बिघाडी:

## काँग्रेस शहराध्यक्षांनी खा.बजरंग सोनवणेंवर व्यक्त केली जाहीर नाराजी

### खासदारांना जाण राहिली नाही...



बीड लोकसभेत बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्यासाठी महाविकास आघाडी म्हणून आम्ही काँग्रेस पक्षाने आघाडीचा धर्म पाळत मोठा विजय मिळवून दिला.आज तीन महिने झाले पण बजरंग सोनवणेनी कधी साधा संपर्कही केलेला नाही. शिवस्वराज्य यात्रे निमित्ताने परळी शहरात आले पण आघाडीच्या कुठल्याही नेते पदाधिकारी, कार्यकर्त्यांना साधा संपर्कही केला नाही.काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जीवाचे रान करुन न डगमगता बजरंग सोनवणेंना विजयी करण्यासाठी प्रयत्न केले. पण खासदारांना याचे काहीच देणेघेणे राहिले नसल्याचे दिसून येत आहे.त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या नेते, कार्यकर्त्यांत त्यांच्याबद्दल प्रचंड नाराजी सूर आहे.

**– सय्यद हनीफ उर्फ बहादुरभाई,** शहराध्यक्ष राष्ट्रीय काँग्रेस, परळी वैजनाथ.

परळी वैजनाथ, (बातमीदार):- लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा धर्म इमानदारीने पालन करून अतिशय कठीण परिस्थितीत खासदार बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करणाऱ्या घटक पक्षांचा निवडून आल्यानंतर मात्र त्यांना विसर पडला असल्याचा आरोप करत परळी काँग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद हनिफ यांनी खा. बजरंग सोनवणे यांच्यावरील नाराजी जाहीरपणाने व्यक्त केली आहे. त्यामुळे परळीतील एक दिलाने काम करणाऱ्या महाविकास आघाडीतील प्रमुख पक्षांमध्ये हळूहळू बिघाडी होतेय का ? असा सवाल उपस्थित होत आहे.

या संदर्भाने परळी शहर काँग्रेसचे अध्यक्ष सय्यद हनीफ उर्फ बहादुर भाई यांनी एक प्रसिद्धीपत्रक काढले असून त्यामध्ये जाहीरपणाने खा. बजरंग सोनवणे यांना निवडून आल्यानंतर महाविकास आघाडीतील इतर पक्षांचा विसर पडल्याचे म्हटले आहे. लोकसभा निवडणूक झाल्यानंतर बजरंग सोनवणे हे बीडचे खासदार म्हणून निवडून आले त्यानंतर काल दि.१६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची शिवस्वराज्य यात्रा परळीत आली होती. या निमित्ताने खा.बजरंग सोनवणे लोकसभेनंतर पहिल्यांदाच परळीत आले. मात्र खासदार झाल्यानंतर त्यांनी ना परळी येथील काँग्रेस पदाधिकाऱ्यांशी संपर्क ठेवला ना आभाराचा साधा मेसेज केला. शिवस्वराज्य यात्रेनिमित्त पहिल्यांदाच परळीत आल्यानंतरही भेटघेणे किंवा संपर्क करणे खासदारांनी टाळले. त्यामुळे नाराज परळी शहर काँग्रेसचे अध्यक्ष सय्यद हनीफ उर्फ बहादुर भाई यांनी जाहीर प्रसिध्दीपत्रक काढून जाहीर नाराजी व्यक्त केली.त्यामुळे परळीतील एक दिलाने काम करणाऱ्या महाविकास आघाडीतील प्रमुख पक्षांमध्ये हळूहळू बिघाडी होतेय का ? असा सवाल उपस्थित होत आहे. ***



मराठा आरक्षण योद्धा मनोज (दादा) जरांगे पाटील यांची अंतरवाली सराटी येथे सोमवार, दि.१९/८/२०२४ रोजी भेट घेतली. यावेळी श्री वैजनाथ देवस्थांन ट्रस्टचे विश्वस्त राजेश देशमुख यांनी प्रभू वैद्यनाथाचे दर्शन करतांनाची व मराठा समाजाला मार्गदर्शन करतांनाची प्रतिमा (फोटो) देवुन शाल, श्रीफळ, देऊन सत्कार केला. यावेळी प्रकाशराव वानखेडे, डॉ.यशवंत देशमुख, रमाकांत काळे आदी उपस्थित होते.

# लिंबोटा गावच्या शेतकऱ्याची मुलगी झाली पोलीस उपनिरीक्षक

परळी वैजनाथ (बातमीदार):- लिंबोटा गावची सुकन्या कु. राणी दत्तू कराड हिने पीएसआय होण्याचा गावात पहिला मान मीळवला. एम.पी.एस.सी परीक्षेत मार्फत व्ही जे एन टी मध्ये महाराष्ट्रात पहिली आली. नुकत्याच झालेल्या एम.पी.एस.सी परीक्षेत ती राज्यातून एमपीएससी परीक्षेतून पहीली आली. वडील शेतकरी आई घरकाम आणि मजुरी करते (एवढ्या कठीण परस्थीतीत तीने स्वःताच्या बळावर व आई वडीलांचा जिद्दीने शिकत राहीली. लिंबोट्यात तेव्हा आठवी ते दहावी पर्यन्त ची शाळा पांगरीला वश श्री संत भगवान बाबा विद्यालयात शिकली आणि ११ वि व १२ पर्यंत शिक्षण तिचे फुलचंद भाऊ कराड यांनी महाविद्यालय आणल व




मुलीचा शिक्षणाची सोय केली. राणीच शिक्षण भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ येथे झाले. पुढे तीने एम पी एस सी चा आभ्यास पुण्याला केला. आई वडील कमी पैसे देत होते तरी ती खचली नाही. लिंबोट्या सारखा छोट्या गावातून ती आज पीएसआय झाली. ही ही बाब गावच्या नागरिकांना खुप आभीमानाची गोष्ट आहे. आज श्री संत भगवान बाबा शाळेत संस्थाचालक फुलचंद भाऊ कराड यांच्या शुभहस्ते तीचा सत्कार झाला. यावेळी तिच्या यशा बाबत उपस्थित पालक व गावकऱ्यांना अक्षरशा भावणा आवरता आल्या नाहीत. व ती म्हणाली मी आई वडीलांचे गुरुजनाचे नाव कधीच जाऊ देणार नाही. वेळ पडेल तेव्हा माझ्या गावच्या मुला मुलींना येऊन मार्गदर्शन करेन. माझ्य गावचा स्वाभीमान कायम जपेल. राणी हि फुलचंदभाऊ कराड यांची नात्याने भाच्ची आहे. ***

**बचत विजेची समृद्धी राष्ट्राची !**




संपादकीय...

# शेतकऱ्यांसाठी मोठी पर्वणी...

**सुविचार :–** माणसाच्या परिचयाची जरी सुरूवात चेहऱ्याने होत असली तरी, त्याची संपूर्ण ओळख वाणी, विचार, व्यवहार आणि कर्मानीच होते.

परळी वैजनाथ येथील श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या महाशिवरात्रीला भरणाऱ्या यात्रेत तालुका कृषी कार्यालयाच्या वतीने पूर्वी तालुका पातळीवरील कृषी प्रदर्शन भरवले जायचे. परळी परिसरातील शेतीत शेतकऱ्यांनी केलेल्या वेगवेगळ्या शेती विषयक, प्रयोगाची, घेतलेल्या उल्लेखनिय पिकांची माहिती, उत्पादने, शेतकऱ्यांसाठी असलेल्या शासनाच्या विविध योजना, शेतीची औजारे, बी–बियाणे, पुरक उद्योग आदींची माहिती या प्रदर्शनातून व्हायची. महाशिवरात्रीला प्रभू वैद्यनाथच्या दर्शनाला येणारे शेतकरी, इतर भाविक आवर्जून या प्रदर्शनाला भेट द्यायचे. मंदिर मार्गावर व परिसरात हे प्रदर्शन भरवले जायचे. कितीतरी वर्षे हा उपक्रम परळीत कृषी खात्याने राबवला. पुढे अधिकाऱ्यांची उदासिनता, निष्क्रीयता, निधीची कमतरता अशा या ना त्या कारणाने परळीच्या यात्रेला भरणारे कृषी प्रदर्शन बंद झाले. नंतरच्या काळात काँग्रेसचे नेते ॲड.अनील मुंडे पांगरीकर, ॲड.जीवनराव देशमुख, ॲड.कडभाने व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांच्या शेतकरी प्रतिष्ठाण मार्फत यात्रेत परळीत अनेक वर्षे तालुका कृषी प्रदर्शन भरवले. परंतु पुढे तेही बंद झाले. मधल्या काळात इतरांनी एक दोन वेळा असा उपक्रम राबवण्याचा प्रयत्न केला होता, परंतु तो अखंड राहिला नाही.

गेल्या काही वर्षात पुणे, बारामती, नाशिक, सांगली येथे राज्य व देशपातळीवरील कृषी प्रदर्शन नियमित भरत आहेत. राज्यासह परराज्यातील शेतकरी, शेतीशी संबंधीत उद्योजक, व्यापारी व इतर या प्रदर्शनाला हजारोंच्या संख्येने भेट देतात. शेतीतील नव्या बदलाची, तंत्राची, उत्पादनाची तसेच औजारे, औषधे, खते इतर साहित्य याची माहिती घेतात, खरेदी करतात, शेती व शेतकऱ्यांसाठी हा उपक्रम चांगला असतो. दिवसेंदिवस कृषी प्रदर्शनाचे आयोजन राज्यात इतर ठिकाणीही होऊ लागले आहे. आपल्या बीड जिल्ह्यात गेवराई येथे गेल्या काही वर्षापासून असे भव्य कृषी प्रदर्शन भरवले जाते. त्यासही मोठा प्रतिसाद मिळतो आहे.

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री व कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून परळीत नाथ रोड मार्गावरील परळी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानावर दिनांक २१ ते २५ ऑगस्ट २०२४ दरम्यान भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री मुंडे मंत्री असलेल्या कृषी विभागाच्या वतीने हे प्रदर्शन भरवण्यात येत आहे. परळी शहाच्या इतिहासात प्रथमच असे भव्य दिव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन भरत आहे. पाच दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनात शेतकऱ्यांसाठी सेंद्रीय शेती, नवे संशोधन यांसह पशू प्रदर्शन, धान्य महोत्सव, रानभाज्या महोत्सव, शेतकऱ्यांना मार्गदर्शन, चर्चासत्र, संवाद, शासनाच्या विविध कृषी व शेतकऱ्यांसाठीच्या योजनांची माहिती, विविध आधुनिक कृषी औजारे, त्यांचे प्रदर्शन, माहिती, बचत गटांच्या उत्पादनाचे प्रदर्शन, विक्री, शेतीची उत्पादने, विक्री, ड्रोन फवारणीचे प्रात्यक्षिक यांसह शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरणाऱ्या उपक्रमांची, तंत्रज्ञानाची माहिती या प्रदर्शनात असणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान, मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार यांच्यासह राज्यातील मंत्री सुनील बनसोडे, अब्दुल सत्तार, अतुल सावे, तानाजी सावंत, खा.सुनील तटकरे, आ.पंकजाताई मुंडे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत बुधवारी (दि.२१) दुपारी होणार आहे. या प्रदर्शनाची तयारी पूर्ण झाली असून प्रदर्शनाच्या मार्गावर भव्य स्वागत कमानी, प्रदर्शनस्थळी भव्य वॉटरप्रुफ सभा मंडप, स्टॉल उभारले गेले आहेत. विविध कंपन्यांची उत्पादने, उत्पादक प्रदर्शन स्थळी दाखल झाले आहे. राज्य शासनाच्या कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच इतर शासकीय यंत्रणेतील कर्मचारी या प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत. हे प्रदर्शन यशस्वी व्हावे म्हणून स्वतः मंत्री धनंजय मुंडे व त्यांचे सहकारी प्रयत्न करत आहेत. परळीसह जिल्ह्यातील व राज्यातील शेतकऱ्यांसाठी हे प्रदर्शन मार्गदर्शक व उपयोगी ठरणार आहे. या पर्वणीचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यायला हवा.! ***

# मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा लाभ घेऊया, चला धार्मिक स्थळे पाहूया !

विविधतेने नटेलेला असा आपला भारत देश आहे. भारतात तसेच महाराष्ट्रासह इतर राज्यांमध्ये भाविकांनी गजबजलेली प्रसिद्ध तीर्थक्षेत्रे पाहायला मिळतात. राज्यासह देशात असे असंख्य ज्येष्ठ नागरिक आहेत. ज्यांचे या तीर्थक्षेत्रांना आयुष्यात एकदा तरी भेट देता यावी असे स्वप्न असते. पण अनेकदा गोरगरीब सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांना त्यांच्या आर्थिक अडचणींमुळे तसेच कुणी सोबत नसल्यामुळे आणि पुरेशा माहितीच्या अभावाने तिथे जाता येत नाही. परंतु आता अशा ज्येष्ठ नागरिकांना काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही. काही ज्येष्ठ नागरिक आर्थिक, शारीरिक परिस्थितीमुळे त्यांची तीर्थक्षेत्रांना जाण्याची इच्छा पूर्ण करू शकत नाहीत. हीच बाब लक्षात घेऊन राज्य शासनाने ' महाराष्ट्रातील सर्व धर्मियांमधील ज्येष्ठ नागरिकांसाठी म्हणजेच ६० वर्ष व त्यावरील नागरिकांसाठी 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना' सुरू केली आहे.

हिंदू धर्मात चारधाम यात्रा, माता वैष्णोदेवी यात्रा, अमरनाथ यात्रा तसेच इतर धर्मीयांची मोठी तीर्थक्षेत्रे आहेत. देशातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्राची मोफत यात्रा करण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना या योजनेमध्ये भारतातील एकूण ७३ व महाराष्ट्र राज्यातील ६६ तीर्थक्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे. जवळपास देशातील व राज्यातील सर्व महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे.

**योजना सुरू करण्यामागचा मानसः–** राज्यातील सर्व धर्मातील सर्वसामान्य कुटुंबातील ज्येष्ठ नागरिक त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे वा कोणी सोबत नसल्याने आणि पुरेशी माहिती नसल्यामुळे तीर्थयात्रा करण्याचे स्वप्न पूर्ण होत नाही. ही बाब विचारात घेऊन ज्येष्ठ नागरिकांना देशातील मोठ्या तीर्थ स्थळांना जाण्याची इच्छा पूर्ण व्हावी. यासाठी त्यांना राज्यातील आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची/दर्शनाची संधी देण्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना' सुरु करण्यात आली आहे.

**योजनेत कोणत्या स्थळांचा समावेशः–** या योजनेमध्ये भारतातील एकूण ७३ व महाराष्ट्र राज्यातील ६६ तीर्थक्षेत्रांचा योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. यामध्ये मुंबईतील सिद्धीविनायक, चैत्यभूमी, माउंट मेरी चर्च; आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणांचाही समावेश आहे.तीर्थक्षेत्रांमध्ये वैष्णोदेवी मंदीर, अमरनाथ गुहा, अमृतसरमधील सुवर्ण मंदीर, अयोध्येतील श्रीराम मंदीर, वेरावळमधील सोमनाथ मंदिर आणि ओडिशातील जगन्नाथ पुरी या प्रमुख धार्मिक स्थळांचा समावेश होतो. याशिवाय तामिळनाडू, केरळ, मध्यप्रदेश, राजस्थान, बिहार, उत्तरप्रदेश, गुजरात, झारखंड, आंध्रप्रदेश, आसाम, ओरीसा, झारखंड, उत्तराखंड, दिल्ली, पंजाब, जम्मू आणि काश्मिर आणि कर्नाटक या धार्मिक स्थळांचा समावेश आहे. त्याचबरोबर मुंबईतील १५ धार्मिक स्थळंही या यादीत आहेत. या योजनेंतर्गत निर्धारित तीर्थ स्थळांपैकी एका स्थळाच्या यात्रेकरिता पात्र व्यक्तीला या योजनेचा केवळ एक वेळच लाभ घेता येईल. या योजनेअंतर्गत लाभार्थी व्यक्तीला प्रवास खर्चाची कमाल मर्यादा प्रती व्यक्ती ३० हजार रुपये इतकी असेल. यामध्ये प्रत्यक्ष प्रवास, भोजन, निवासाची सोय इत्यादी सर्व बाबींचा समावेश असेल.

**योजनेसाठी आवश्यक पात्रता:–**

* लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणे आवश्यक आहे.
* वय वर्ष ६० आणि त्यावरील ज्येष्ठ नागरिक तसेच
* लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम अडीच लाखांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

**योजनेसाठी अपात्र कोण ठरणार?**

कुटुंबातील सदस्य आयकरदाता नसावा. कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/ मंडळ/ भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत, असे सदस्य या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र ठरणार नाहीत. दरम्यान, अडीच लाखांपर्यंत उत्पन्न असलेले बाह्य यंत्रणाद्वारे कार्यरत असलेले कर्मचारी, स्वयंसेवी कामगार आणि कंत्राटी कर्मचारी मात्र या योजनेसाठी पात्र ठरतील. कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार/आमदार नसावेत. कुटुंबातील सदस्य भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या बोर्ड/कॉर्पोरेशन/उपक्रमाचे अध्यक्ष/उपाध्यक्ष/संचालक/सदस्य नसावेत. चारचाकी वाहनं (ट्रॅक्टर वगळून) त्याच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावर नोंदणीकृत नसावे. प्रवासासाठी शारिरीक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे आणि कोणत्याही संसर्गजन्य रोगानं ग्रस्त नसावे, जसे की टीबी, हृदयाशी संबंधित श्वसन रोग, कोरोना, थ्रोम्बोसिस, मानसिक आजार, संसर्गजन्य कुष्ठरोग इत्यादी. अर्जासोबत, ज्येष्ठ नागरिकाला सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्याने पूर्ण आरोग्य तपासणी केल्यानंतर ती व्यक्ती शारीरिकदृष्ट्या निरोगी आणि प्रस्तावित प्रवासासाठी सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. (हे प्रमाणपत्र प्रवासाच्या तारखेपासून १५ दिवसांपेक्षा जास्त जुने नसावे) जे अर्जदार मागील वर्षांमध्ये लॉटरीत निवडले गेले होते, परंतु प्रवासासाठी आमंत्रित करूनही त्यांनी प्रवास पूर्ण केला नाही.

(महाराष्ट्र महासंवाद वरुन)




**परळी वैजनाथ :– येथील तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार बाबुराव रुपनर यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते महसूल दिनानिमित्त बीड येथे त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार स्वीकारताना श्री रुपनर व त्यांचे कुटुंबिय.**

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com

* वर्ष ०८ * अंक १५ * पृष्ठ संख्या– ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) बुधवार, दि. २१ ऑगस्ट २०२४ * किंमत : २ रू.




परळी वैजनाथ :– येथील उर्जानगर वसाहतीच्या प्रवेशद्वारावर भरपावसाळ्यात रस्त्याचे खोदकाम करुन गुत्तेदाराने हजारो नागरिकांना वेठीस धरले आहे. प्रवेशद्वारावर पाऊस पडल्यानंतर चिखल व दलदल होत आहे. पावसाचे पाणी साचत आहे. यामुळे वसाहतीत ये–जा करणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. मोटारसायकल स्वार घसरुन पडत आहेत. अनेकजण जखमी झाले आहेत. याकडे संबंधितांनी त्वरित लक्ष देवून नागरिकांची ही गैरसोय दूर करावी अशी मागणी होत आहे.

# परळी मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ.शालिनीताई कराड यांची निवड

परळी वैजनाथ, (बातमीदार) :– परळी वैद्यकीय शहरातील क्षेत्रातील महत्त्वाच्या असणाऱ्या परळी मेडीकल असोसिएशनची नवीन कार्यकारणी दि.१५ ऑगस्ट २०२४ रोजी स्वातंत्र्य दिनी निवड करण्यात आली. परळी मेडीकल असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. शालिनीताई कराड यांची तर सचिवपदी डॉ. मनोजकुमार मुंडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. यानिवडीचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. यामध्ये परळी शहरातील पहिल्या महिला अध्यक्ष होण्याचा मान डॉ. शालिनीताई कराड यांना मिळाला आहे.

परळी वैजनाथ मेडिकल असोसिएशनच्या झालेल्या बैठकीमध्ये डॉ. डॉ. शालिनीताई कराड यांची मेडिकल असोसिएशनचे नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून तसेच सचिव म्हणून डॉ. मनोजकुमार मुंडे यांची सर्वानुमते बिनविरोध निवडण्यात आली. या बैठकीस डॉ. मधुसूदन काळे, डॉ. झंवर, डॉ. अशोक लोढा, डॉ.भायकर, डॉ.संतोष मुंडे, डॉ.सौ. गुट्टे, डॉ. अंजली काळे, डॉ. रंजना घुगे, डॉ.सौ. गजेवार, डॉ.सौ. तापडिया, डॉ.सौ. रांदड व परळी शहरातील सर्व डॉक्टर उपस्थित होते.



मावळते अध्यक्ष डॉ. माऊली घुगे व सचिव डॉ. सतीष गुट्टे यांनी त्यांचे अभिनंदन करुन त्यांच्याकडे पदभार सोपवला. तसेच विविध विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली व मेडिकल असोसिएशनचे संघटन वाढविण्यासाठी भर देण्यात येणार असल्याचे बैठीत सांगण्यात आले. परळी शहरातील वैद्यकीय क्षेत्रातील महत्त्वाच्या असणाऱ्या परळीमेडीकल असोसिएशनच्य अध्यक्षपदी प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ मा.डॉ. सौ. शालिनीताई कराड यांची तर सचिवपदी प्रसिद्ध दंत चिकित्सक डॉ.मनोजकुमार मुंडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. डॉ. कराड व डॉ. मुंडे यांनी मनोगत व्यक्त करताना आगामी वर्षात त्यांनी संकल्प केलेल्या सभासद व त्यांचे कुटुंबीय यांच्यासाठी असलेल्या विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रिडा व वैद्यकीय कल्याणकारी योजनांची माहिती मांडली. तसेच माजी अध्यक्ष व इतर सर्व अनुभवी सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली मेडिकल असोसिएशनच्या कार्यास चांगली गती देण्यासाठी विविध कार्यक्रम राबविण्याचा मनोदय व्यक्त केला. यावेळी उपस्थित सर्वांनी नविन कार्यकारीणीचे सहर्ष स्वागत आणि अभिनंदन करून. त्यांना पुढील उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. ***

# परळीतील फोटोग्राफी क्षेत्राला लाभली नव 'संजीवनी'

छायाचित्र म्हणजे फोटो ही केवळ एक निर्जीव वस्तू नसते, तर ती असते त्या व्यक्तीच्या जीवनातील एक अमूल्य आठवण, छायाचित्रकाराने आपल्या कॅमेऱ्यात बंदिस्त केलेली. आपले, आपल्या कुटुंबातील व्यक्तींचे फोटो पाहताना आठवणींचा खजिनाच आपण उघडत असतो. हा खजिना ज्याच्यामुळे जतन करता आला, त्या छायाचित्रकारास मात्र आपण विसरून जातो. या छायाचित्रकारांचे ऋण व्यक्त करण्यासाठी आणि छायाचित्रणास उतेजन देण्यासाठी जगभरात १९ ऑगस्ट हा ''जागतिक छायाचित्रण दिन'' म्हणून साजरा केला जातो. यावर्षीच्या जागतिक छायाचित्रण दिनाच्या निमित्ताने आपल्या परळीतील एका अनोख्या छायाचित्रकाराचा परिचय करून देण्याचा हा एक छोटासा प्रयत्न. फोटोग्राफी हा पुरुषांची मक्तेदारी असलेला प्रांत. या पुरुषांच्या दुनियेत नवीन कल्पना सोबत घेऊन अत्यंत दमदारपणे आपले स्वतंत्र स्थान निर्माण करणारी आणि मरगळलेल्या फोटोग्राफी क्षेत्राला नवीन ''संजीवनी'' देणारी एक उत्कृष्ट फोटोग्राफर म्हणजे सौ संजीवनी राम भाले ''बेबी मॅजिक'' या आपल्या नवजात बाळांच्या फोटोसाठीच वाहिलेल्या फोटो स्टुडिओच्या माध्यमातून आपल्या फोटोग्राफर पतीला समर्थ साथ देत असलेली एक अतिशय चांगली छायाचित्रकार. मोबाईल कॅमेरा मधील क्रांती नंतर ग्राहकांनी फोटो काढण्यासाठी स्टुडिओत जाणे जवळजवळ सोडून दिले आहे. प्रत्येक जण आपले फोटो आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात स्वतःच क्लिक करून हे फोटो सोशल मीडिया द्वारे सार्वजनिक करण्यात आणि आपली कलाकारी दाखवण्यात व्यस्त आहे. हे फोटो जतन करण्यासाठी गुगलने गुगल फोटो फुकटात उपलब्ध करून दिले आहे,त्यामुळे फोटो काढणे हा पूर्वी जसा सोहळा असायचा, तसा तो आता राहिलेला नाही. आपल्या दररोजच्या आठवणी आपण अत्यंत सहजपणे मोबाईल कॅमेऱ्याने टिपून त्या पाहिजे तेवढ्या प्रमाणात जतन करून ठेवू शकतो. फोटोग्राफी क्षेत्राला या नवीन बदलांमुळे मरगळ आल्यासारखी वाटत होती. परळीतील उत्कृष्ट फोटोग्राफर असा नावलौकिक असलेले श्रीराम भाले






आपल्या भाले फोटोग्राफी या स्टुडिओच्या माध्यमातून परळीकरांना फोटोग्राफीची सेवा देत असताना, त्यांची पत्नी आपल्या आदिती आणि व्यंकटेश या चिमुकल्यांना सांभाळत आपले आदर्श गृहिणीचे कार्य पार पाडत होती; याचवेळी फोटोग्राफीची आपल्या मनातील आवड ओळखून आणि या क्षेत्रातील बदलांना सामोरे जाण्यासाठी आपल्या पतीशी चर्चा करून फक्त नवजात बालक आणि चिमुकल्यांच्या भावविभोर करणाऱ्या अदा कॅमेऱ्यात बंदिस्त करण्यासाठी ''बेबी मॅजिक'' या स्वतंत्र स्टुडिओच्या माध्यमातून परळीकरांना सेवा देण्यास सज्ज झाली, आणि आज या क्षेत्रात स्वतःचे एक स्वतंत्र स्थान या आदर्श गृहिणीने निर्माण केले आहे, ही परळीकरांसाठी अभिमानाची बाब आहे. खरे म्हणजे महिलांना स्वतः नटून थटून, स्वतःचेच फोटो काढण्याची हौस असते, त्यासाठी त्या पाहिजे तेवढा वेळ द्यायला तयार असतात. स्वभावतःच सर्व स्त्रियांमध्ये एक कलाकार दडलेला असतो. रंगसंगती बद्दलचे त्यांचे ज्ञान तर प्रत्येक पुरुष मान्य करतो. आपले हे उपजत गुण ओळखून आणि प्रकाश योजना, बॅकग्राऊंड, फोटोचा ठराविक अँगल या फोटोग्राफी मधील बारकाव्यांचा अभ्यास करून स्वतःचे फोटो न काढता इतर स्त्रियांना आणि बालकांना सजवून त्यांचे अप्रतिम फोटो काढण्याचे कसब संजीवनी भाले यांनी प्राप्त केले आहे. लहान बालकांचे मुड्स सांभाळून, त्यांची योग्य वेशभूषा करून अगदी सहजपणे त्यांचे आईच्या नजरेतून विविध क्षणांचे फोटो त्या टिपतात. यामधील त्यांचे कौशल्य वाखाणण्याजोगे आहे. नुकत्याच जन्मलेल्या बाळापासून ते केवळ एक महिना वयाच्या बाळाचेच फोटोशूट त्या करतात. आपल्या या स्वतंत्र स्टुडिओच्या माध्यमातून नवजात बाळांच्या पालकांसाठी, आपल्या बाळाचे लहानपण कॅमेऱ्यात बंदिस्त करण्याचा त्यांचा हा ''बेबी मॅजिक स्टुडिओ''चा प्रयत्न वरदानच ठरला आहे, यात शंका नाही.

मोठ्या शहरातील आधुनिक स्टुडिओच्या धर्तीवर केवळ लहान बालकांच्या फोटोसाठीचा हा स्वतंत्र स्टुडिओ परळी सारख्या लहान गावात काढणे हे धाडसाचेच काम आहे. पण सौ संजीवनी भाले यांनी ते आपल्या कलेच्या आणि मेहनतीच्या जोरावर शक्य करून दाखवले आहे. यासोबतच मॅटर्निटी फोटोशूट, ब्रायडल फोटोशूट, मॉडेलिंग फोटोज इत्यादी क्षेत्रात पण त्या सध्या आपले योगदान देण्याचा प्रयत्न करत आहेत.

जागतिक छायाचित्र दिनाच्या निमित्ताने परळीतील या महिला छायाचित्रकारास फोटोग्राफीच्या पुढील प्रवासासाठी अनेक अनेक शुभेच्छा.

शब्दांकन...

**– गोपाळ आंधळे**

पत्रकार, परळी वैजनाथ.